जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 FEB 2024 सकाळ

# लघुनाटिकांनी गाजला दिवस

## शिवस्पंदन महोत्सव : आज ७५ लोकवाद्यांचा आवाज घुमणार

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २२ : शिवस्पंदन महोत्सवातील आजचा दिवस मूकनाट्ये, नकला आणि लघुनाटिकांनी शिवाजी विद्यापीठ परिसरातील विद्यार्थ्यांनी गाजविला. महोत्सवात आज सायंकाळी साडेसहा वाजता या महोत्सवाचा बक्षीस वितरण समारंभ कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात होईल. त्यापूर्वी सकाळच्या सत्रात एकल नृत्य, समूहनृत्य प्रकारांचे सादरीकरण होईल.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शिवस्पंदन महोत्सवांतर्गत सादर करण्यात आलेले एक मूकनाट्य.

विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभागातर्फे आयोजित या महोत्सवात आज विद्यार्थ्यांनी गंभीर तसेच हलकेफुलके विषय मोठ्या ताकदीने सादर केले आणि उपस्थितांची वाहवा मिळविली. सामाजिक व कौटुंबिक एकोपा, राजकारण, मोबाईलचं व्यसन आणि एकूणच सामाजिक परिस्थितीवर भाष्य करणारी उत्तम मूकनाट्ये सादर झाली. त्यानंतर नकलांच्या विविध विषयांवर परिस्थितींवर चिमटे काढत हास्याची पिकवण केली. लघुनाटिकेच्या माध्यमातून सामाजिक, राजकीय, कौटुंबिक, वैश्विक आणि भावनिक विषयांवर उल्लेखनीय सादरीकरण झाले.

या महोत्सवात शुक्रवारी अखेरच्या दिवशी विशेष लोकवाद्य महोत्सव आणि प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. देशभरातील ढोलकी, ढोलक, पखवाज, मृदुंगम, खोळ, घटम, गंजिरा, खंजिरी, दिमडी, हलगी, पराई, शाहिरी डफ आदी विविध ७५ लोकवाद्यांच्या वादनाचा आस्वाद घेण्यासाठी नागरिकांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांनी केले.

### चार ठिकाणी लोकवाद्याचे वादन

■ शुक्रवारी सकाळी साडेसात ते रात्री साडेनऊ यावेळेत लोकवाद्य वादन महोत्सव होईल. देशाच्या चार दिशांकडील राज्यांतील वाद्ये विद्यापीठाच्या परिसरात चार दिशांना वाजविण्याचा हा उपक्रम आहे. त्यानुसार छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोरील हिरवळ, क्रांतिवन परिसर, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाशेजारील तलाव व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळ्यासमोरील हिरवळ या चार ठिकाणी हे वादन सादरीकरण होईल.

23 FEB 2024
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'शिवस्पंदन'मध्ये लघुनाटिकेतून सामाजिक परिस्थितीवर भाष्य

## शिवाजी विद्यापीठात आज ७५ लोकवाद्यांचे वादन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठात विद्यार्थी विकास विभागातर्फे सुरू असलेल्या शिवस्पंदन महोत्सवात गुरुवारी सामाजिक परिस्थितीवरील मूकनाट्ये, नकला व लघुनाटिकांद्वारे भाष्य केले. विद्यार्थ्यांनी गंभीर, हलकेफुलके विषय सादर करीत उपस्थितांची वाहवा मिळविली.

दि. २३ रोजी विशेष लोकवाद्य महोत्सव, प्रदर्शन होणार आहे. देशभरातील ७५ लोकवाद्यांच्या वादनाचा आस्वाद नागरिकांना घेता येणार आहे. चार दिशांकडील राज्यांतील वाद्ये विद्यापीठाच्या परिसरात चार दिशांना वाजविण्याचा उपक्रम होणार आहे. दुपारी १.३० ते ३.३० या कालावधीत राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात लोकवाद्यांचे पुन्हा एकत्रित सादरीकरण होईल. सकाळी १० ते १ आणि दुपारी ४ ते ७ वाजेपर्यंत लोकवाद्यांचे राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात प्रदर्शन मांडण्यात येईल.



कोल्हापूर : विद्यापीठात शिवस्पंदन महोत्सवांतर्गत सादर करण्यात आलेली शिवचरित्रावरील लघुनाटिका.

सामाजिक व कौटुंबिक एकोपा, राजकारण, मोबाईलचे व्यसन अशा सामाजिक परिस्थितीवर भाष्य करणारी मूकनाट्ये सादर झाली. नकलांच्या विविध विषयांवर परिस्थितींवर चिमटे काढत हास्याची पिकवण करण्यात आली. लघुनाटिकेच्या माध्यमातून सामाजिक, राजकीय, कौटुंबिक, वैश्विक आणि भावनिक विषयांवर उल्लेखनीय सादरीकरण झाले. महोत्सवात शुक्रवारी सायंकाळी ६.३० वाजता शिवस्पंदन महोत्सवाचा बक्षीस वितरण समारंभ होणार आहे.

23 FEB 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मूकनाट्यासह लघुनाट्याने जिंकली रसिकांची मने

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवस्पंदन महोत्सवात मूकनाट्ये, नकला आणि लघुनाटिका सादर करून कलाकारांनी रसिकांची मने जिंकली. विद्यार्थी कलाकारांनी गंभीर तसेच हलकेफुलके विषय मोठ्या ताकदीने सादर केले. सामाजिक व कौटुंबिक एकोपा, राजकारण, मोबाईलचं व्यसन आणि एकूणच सामाजिक परिस्थितीवर भाष्य करून सामाजिक संदेश दिला. प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात कलाकारांना दाद दिली.

शिवस्पंदन महोत्सवात कलाकारांनी उत्तम मूकनाट्ये सादर केली. त्यानंतर नकलांच्या विविध विषयांवर चिमटे काढत हास्याची पिकवण करण्यात आली. लघुनाटिकेच्या माध्यमातून सामाजिक, राजकीय, कौटुंबिक, वैश्विक आणि भावनिक विषयांवर




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शिवस्पंदन महोत्सवांतर्गत सादर करण्यात आलेली शिवचरित्रावरील लघुनाटिका.

उल्लेखनीय सादरीकरण झाले. या स्पर्धेचा आज (दि. २३) समारोप होणार आहे. आज देशभरातील ७५ लोकवाद्यांच्या वादन छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोरील हिरवळ, क्रांतीवन परिसर, संगीत व नाट्यशास्त्र

## शिवस्पंदन महोत्सवाचा आज समारोप व बक्षिस वितरण

अधिविभागाशेजारील तलाव व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळ्यासमोरील हिरवळ या चार ठिकाणी वादन सादरीकरण होईल. सकाळी १० ते १ आणि दुपारी ४ ते सायंकाळी ७ या वेळेत विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात लोकवाद्यांचे प्रदर्शन मांडण्यात येईल. सायंकाळी ६.३० वाजता महोत्सवातील स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. सकाळच्या सत्रात एकल नृत्य व समूहनृत्य प्रकारांचे सादरीकरण होईल. वाद्यांमध्ये ढोलकी, ढोलक, पखवाज, मृदुंगम, खोळ, घटम, गंजिरा, खंजिरी, दिमडी, हलगी, पराई, शाहिरी डफ, डफ, डफड, फायबर हलगी, खमक, बुगचू, भपंग, चौंडकं, डमरू, इडक्का, डवर, उडुक्काई, बगलबच्चा, दड्ड, छिंद, डहाका, उरुमी, याक्बेर, थाविल, पंबई इसाई, मोडा, कोट्ट, ताशा, चंडा, तुलूनाडू थासे, चेंडा, तबला, संबळ, सनई, बासरी, सुन्द्री, शंख, खालू सनई, नादस्वरम, तोटा, तुणतुणे, तुंबी, मोरसिंग, गोंगाणा, एकतारी, दामलाई डुमलाई, खालुबाजा, खालूची टिमकी, ढोल, पुणेरी ढोल, धनगरी ढोल, पंजाबी ढोल, कच्ची ढोल, थमरू, मांदल, मुरासू, थापढोल किंवा डोल, नगारा, चौघडा, मांदल, डुग्गी, काटो, तिबेटियन बाऊल किंवा गॉंग, इडतालम, खैताळ, घाटी, खुळखुळा, झांज, चिमटा, घुंगरू, करताल, मंजिरी, लेझीम, घोळकाटी, टाळ, चिपळी, घंटा, बडुंगडुप्पा, साप, भोरताल, झेंगाट, बिहू ढोल, बंगाली ढोल, ढाक, पहाडी मांदलड आदींचा समावेश आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 FEB 2024
लोकमत



शिवाजी विद्यापीठात शिवस्पंदन महोत्सवांतर्गत शिवचरित्रावरील लघुनाटिका सादर करण्यात आली.

# मूकनाट्य, लघुनाटिका, नकलांनी गाजविला दिवस

## शिवस्पंदन महोत्सव : आज लोकवाद्यांचा जागर

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने सुरू असलेल्या तीन दिवसीय शिवस्पंदन महोत्सवात गुरुवारी मूकनाट्ये, नकला आणि लघुनाटिका सादर केल्या.

एकूणच सामाजिक परिस्थितीवर भाष्य करणारी उत्तम मूकनाट्ये सादर झाली. त्यानंतर नकलांच्या विविध विषयांवर परिस्थितीवर चिमटे काढत हास्याची पिकवण केली. लघु नाटिकेच्या माध्यमातून सामाजिक, राजकीय, कौटुंबिक, वैश्विक आणि भावनिक विषयांवर सादरीकरण झाले. आज, शुक्रवारी सकाळी ७:३० ते ९:३० वा. या कालावधीत लोकवाद्य वादन महोत्सव होईल. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोरील हिरवळ, क्रांतीवन परिसर, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाशेजारील तलाव व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळ्यासमोरील हिरवळ येथे हे वादन सादरीकरण होईल. दुपारी १:३० ते ३:३० दरम्यान राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात या लोकवाद्यांचे पुन्हा सादरीकरण होईल. सकाळी १० ते १ आणि सायंकाळी ४ ते ७ वाजेपर्यंत लोकवाद्यांचे राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात प्रदर्शन मांडण्यात येईल.

### आज बक्षीस वितरण

बक्षीस वितरण समारंभ आज, शुक्रवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात होईल.


23 FEB 2024 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'गांधीवादी मूल्यशिक्षण'ला मिळणार बळ

## विद्यापीठाचा गांधी रिसर्च फौंडेशनशी सामंजस्य करार

■ सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि गांधी रिसर्च फाउंडेशन यांच्या सामंजस्य करार प्रतींचे हस्तांतरण करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि डॉ. गीता धर्मपाल. शेजारी डॉ. अशोक चौसाळकर, अश्विन झाले, विलास शिंदे, गिरीश कुलकर्णी, प्रकाश पवार.

कोल्हापूर, ता. २२ : 'गांधीवादी मूल्यशिक्षण' या विषयावरील अभ्यासक्रम सुरू करण्याबरोबरच अनेक उपक्रम गांधी अभ्यास केंद्रामार्फत वर्षभरात राबविण्यात येतील, असे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे सांगितले.

विद्यापीठाचे गांधी अभ्यास केंद्र आणि जळगाव येथील गांधी रिसर्च फाउंडेशनतर्फे सामंजस्य करार झाला. त्याप्रसंगी ते बोलत होते. फाउंडेशनच्या डॉ. गीता धर्मपाल प्रमुख उपस्थित होत्या.

डॉ. शिर्के म्हणाले, 'महात्मा गांधी यांचा मूल्यविचार, मूल्यशिक्षण आणि नई तालीम, आदींवर आधारित दोन क्रेडिटचा अभ्यासक्रम विद्यापीठात सुरू करण्याचा मानस आहे. त्यासाठी आवश्यक ई-कंटेंटची निर्मिती संयुक्तपणे करता येईल.'

डॉ. धर्मपाल म्हणाल्या, 'या सामंजस्य कराराअंतर्गत शिवाजी विद्यापीठासमवेत फाउंडेशनला संयुक्त संशोधन प्रकल्प हाती घेता येतील.' फाउंडेशनचे डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी गांधी विचार, संस्कार परिषद, गांधीयन लीडरशिप कँप, गांधीतीर्थ भेट, आदी उपक्रमांतून गांधी अभ्यास केंद्राचे सक्षमीकरण करण्यास मदत करू, असे सांगितले. ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर यांनी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्राच्या वाटचालीविषयी उपस्थितांना माहिती दिली. या करारावर कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी तर फाउंडेशनतर्फे डॉ. धर्मपाल यांनी स्वाक्षरी केल्या. गांधी अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार, फाउंडेशनचे डॉ. अश्विन उपस्थित होते.

### कृतिशील उपक्रम राबवावेत

क्रमिक अभ्यासक्रमाच्या जोडीला गांधी विचारांवर आधारित कृतिशील उपक्रमही राबविले जावेत, त्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेलाही समावून घेतले जावे, अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. शिर्के यांनी व्यक्त केली.

जनसंपर्क कक्ष
23 FEB 2024 सकाळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवा संसद विजेत्यांनी योगदान द्यावे

## कुलगुरू डॉ. शिर्के; शिवाजी विद्यापीठाची राष्ट्रीयस्तरावर झेप



कोल्हापूर : सोळाव्या युवा संसद स्पर्धेत उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसमवेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. (डावीकडून) पवन पाटील, प्रतीक्षा कांबळे, प्रतीक्षा पाटील, कृतिका धनगर, प्रल्हाद माने, आसिया जमादार, श्रेया म्हापसेकर, साईसिमरन घाशी, अनमोल पाटील.

कोल्हापूर, ता. २२ : युवा संसद स्पर्धेच्या माध्यमातून मिळालेल्या आत्मविश्वासाच्या बळावर विजेत्या विद्यार्थ्यांनी भावी आयुष्यात देशाच्या विकासामध्ये योगदान द्यावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे केले.

सोळाव्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेमध्ये पश्चिम विभागीय गटात प्रथम क्रमांक मिळविण्याची कामगिरी करणाऱ्या संघातील विद्यार्थ्यांनी कुलगुरू डॉ. शिर्के यांची भेट घेतली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते. स्पर्धेचे विद्यापीठ समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी संघाच्या कामगिरी सांगितली. पवन पाटील, प्रतीक्षा कांबळे, प्रतीक्षा पाटील, कृतिका धनगर, आसिया जमादार, श्रेया म्हापसेकर, साईसिमरन घाशी आणि अनमोल पाटील या विद्यार्थ्यांनी स्पर्धेद्वारे मिळालेला आत्मविश्वास, भारतीय संसदेमध्ये वावरताना मनात जागृत झालेली देशप्रेमाची उदात्त भावना यांविषयी मनोगत व्यक्त केले. दरम्यान, या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ नवी दिल्ली येथे भारतीय संसदेच्या बालयोगी सभागृहात १६ फेब्रुवारी रोजी संसदीय कामकाज राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांच्या हस्ते पार पडला. यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघाने दमदार कामगिरी बजावत दुसऱ्यांदा राष्ट्रीय स्तरावर झेप घेतली. आपल्या विभागात अव्वल कामगिरी केल्यामुळे या कार्यक्रमात शिवाजी विद्यापीठ संघ, समन्वयक आणि उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या आठ विद्यार्थ्यांना पुरस्काराने गौरविण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 FEB 2024 सकाळ

# मध्ययुगात राजकीय विचारांच्या परंपरेत सातत्य

## डॉ. चौसाळकर; विद्यापीठात राज्यशास्त्र विभागातर्फे राष्ट्रीय परिषद

■सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर, ता. २२ : अकराव्या, बाराव्या शतकानंतर भारतीय राजकीय विचारांचा विकास झाला नाही असे काही विचारवंतांचे मत होते. परंतु, मध्ययुगातही अनेक ग्रंथ निर्माण झाले. त्यामुळे राजकीय विचारांची परंपरेमध्ये सातत्य राहिले असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी आज येथे व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित 'मध्ययुगीन राजकीय विचार' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उदघाटनप्रसंगी त्यांचे बीजभाषण झाले. भौतिकशास्त्र अधिविभागाच्या सभागृहातील या परिषदेच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. अभय टिळक होते. विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अभ्यासमंडळाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र भणगे, ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार, डॉ. सुखदेव उंदरे उपस्थित होते.

डॉ. टिळक यांनी प्राचीन भारतीय राजकीय विचार आणि राजकीय अर्थशास्त्र यादृष्टीने मांडणी करत संशोधनाची आवश्यकता सांगितली. राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले. नेहा वाडेकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. आसिया जमादार यांनी सूत्रसंचालन केले. जयश्री कांबळे यांनी आभार मानले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात राज्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित राष्ट्रीय परिषदेत गुरुवारी ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांचे बीजभाषण झाले. शेजारी प्रकाश देसाई, अभय टिळक, प्रकाश पवार, रवींद्र भणगे आदी.

### मध्ययुगीन विचारांवर संशोधन होण्याची गरज : श्रीराम पवार

परिषदेतील पहिल्या सत्रात प्राचार्य डॉ. इस्माईल पठाण, डॉ. टिळक साधन व्यक्ती, तर अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार होते. डॉ. पठाण यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचे प्रशासन यावर मांडणी केली. प्रा. टिळक यांनी संत साहित्य व समता, स्वातंत्र्य, बंधुता, मानवता या राजकीय सामाजिक मूल्यांचा आढावा घेतला. ज्येष्ठ पत्रकार पवार यांनी दोन्ही साधन व्यक्तींच्या मांडणीचा आणि छत्रपती शिवरायांचे प्रशासन, त्यांनी उभारलेले कौशल्यपूर्ण आरमार आदींचा आढावा घेतला. मध्ययुगीन विचारांवर संशोधनाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. दुसऱ्या सत्रात डॉ. वाडेकर यांनी बुधभूषण या ग्रंथाचा, तर शेषनारायण वडवे यांनी दंडनीती या ग्रंथाचा राजकीय अंगाने आढावा घेतला. डॉ. अवनिश पाटील यांनी मित्र लष्करी विचारांचा आणि डॉ. भारती पाटील यांनी राजनीती या ग्रंथाचा आढावा मांडला. तेजस्विनी भोसले यांनी सत्र समन्वयक म्हणून काम पाहिले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 FEB 2024
पुढारी

# राष्ट्रीय गणित उपक्रमात महाविद्यालयांसह शाळांचा सहभाग

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात आयोजित राष्ट्रीय गणित दिन उपक्रमात महाविद्यालये, शालेय विद्यार्थी, शिक्षकांचा लक्षणीय सहभाग होता. गणित विभागाच्या उपक्रमांना उत्तम प्रतिसाद लाभला.

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाच्या अंतर्गत असणारे राष्ट्रीय विज्ञान व तंत्रज्ञान संप्रेषण मंडळ (एनसीएसटीसी), राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग, आणि शिवाजी विद्यापीठाचा गणित अधिविभाग यांनी राष्ट्रीय गणित दिनानिमित्त विविध कार्यक्रम झाले. नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी यांचे 'डिफरंट काईंडस् ऑफ प्रूफ्स' या विषयावर व्याख्यान झाले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या डॉ. हेमंत भाटे यांचे मार्गदर्शन लाभले. पदव्युत्तर गणित विभागांसाठी प्रश्नमंजुषा, निबंध, सेमिनार स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये ५ पदव्युत्तर विभागांतील ३२ विद्यार्थी सहभागी झाले होते. भित्तीपत्रक स्पर्धत ११ शाळांमधील १३ शिक्षकांसह इयत्ता आठवी आणि नववीच्या ३१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यात विविध शाळांनी पारितोषिके मिळवली.



**कोल्हापूर : विद्यापीठात राष्ट्रीय गणित दिनानिमित्त आयोजित विविध उपक्रमांत महाविद्यालयांसह शालेय विद्यार्थ्यांचा सहभागही लक्षणीय ठरला.**



**शिवाजी विद्यापीठातून**

डॉ. सी. एस. मांजरेकर, डॉ. पी. जे. पाटील, डॉ. एस. एस. सुतार, डॉ. आसावरी जाधव, डॉ. सी. एस. निमकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

यावेळी अधिविभागातील प्रा. डॉ. एम. टी. गोफणे, डॉ. के. डी. कुचे, डॉ. जे. पी. खराडे, डॉ. एस. एस. कुंभार, जे. पी. भोसले, डॉ. एस. के. खराडे, एस. डी. थिटे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
23 FEB 2024 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठामध्ये आजपासून संख्याशास्त्र परिसंवादाचे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठामधील संख्याशास्त्र अधिविभागामध्ये दि. २३ व २४ फेब्रुवारी रोजी 'वास्तविक समस्यांचे सांख्यिकीय अन्वेषण' विषयावरील दोन दिवसीय परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे.

परिसंवादाचे उद्घाटन कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणेच्या संख्याशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. अनिल गोरे, मेट्रिक कन्सल्टंसी लि.पुणेचे संस्थापक व अध्यक्ष डॉ. आनंद करंदीकर, सेवानिवृत्त संख्याशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. आर. एन. रटिहळ्ळी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. परिसंवादात संख्याशास्त्र विषयाच्या अध्यापनामध्ये येणाऱ्या अडचणी, नावीन्यता व उपाययोजना तसेच नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार झालेल्या बदलाला सामोरे जाताना शिक्षकांना अध्यापनामध्ये करावे लागणारे बदल, यावर चर्चा होणार आहे. दुसऱ्या सत्रात 'समस्या तुमची, उत्तर आमचे' हा अभिनव उपक्रम होणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन विभागप्रमुख प्रा. डॉ. शशिभूषण महाडिक यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 3 FEB 2024
पुढारी

# प्रशासकीय साक्षरतेसाठी जीवनकौशल्य आत्मसात करणे गरजेचे

## डॉ. रामचंद्र पवार; हंगामी रोजंदारी कर्मचाऱ्यांसाठी विशेष व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोणतेही प्रशासकीय कामकाज करताना प्रशासकीय साक्षरतेसाठी जीवनकौशल्य आत्मसात करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन आजीवन विस्तार व कार्य विभाग संचालक प्रा. डॉ. रामचंद्र पवार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र व आजीवन विस्तार आणि कार्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हंगामी रोजंदारी कर्मचारी यांच्यासाठी 'प्रशासकीय साक्षरता व जीवन कौशल्य' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे होते. डॉ. पवार म्हणाले, जीवनकौशल्य ही जगण्याचा मार्ग आहेत. प्रत्येक कर्मचारी यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी जीवनकौशल्य वाढविणे महत्त्वाचे आहे.

डॉ. के. बी.पाटील म्हणाले, प्रशासकीय कामकाज करताना वृत्ती, कौशल्य आणि ज्ञान महत्त्वाचे आहे. प्रशासकीय साक्षरतेमध्ये कायदा, डिजिटल साक्षरता व संगणक साक्षरता महत्त्वाची आहे.

यावेळी प्रा. दत्तात्रय कमलाकर, डॉ.प्रसाद दावणे, बबन पाटोळे, दयानंद गावडे, डॉ.संजय चोपडे, सरदार आडनाईक, धनाजी करवडे, कुमार शिंदे, विकास पाटील, विशाल हिलगे उपस्थित होते. सहायक प्रा. डॉ. नितीन रणदिवे यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा परिचय सहायक प्रा. डॉ. प्रवीण लोंढे यांनी केला. सहायक प्रा. डॉ. प्रकाश बेळीकट्टी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सचिन भोसले यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 FEB 2024

पुढारी




गुवाहाटी (आसाम) येथील खेलो इंडिया अ. भा. विद्यापीठ नेमबाजी स्पर्धेत यश मिळविणारा शिवाजी विद्यापीठाचा संघ. सोबत प्रशिक्षक-मार्गदर्शक.

# 'खेलो इंडिया' शूटिंग स्पर्धेत सुमेधचे यश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

साई शूटिंग रेंज, खलिपरा, गुवाहाटी (आसाम) येथे सुरू असणाऱ्या खेलो इंडिया अखिल भारतीय विद्यापीठ नेमबाजी स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या सुमेध सासने याने यशस्वी कामगिरी केली.

स्पर्धेच्या १० मीटर एअर रायफल शूटिंग प्रकारात सुमेधने २२८.८ गुणांसह कांस्यपदकाची कमाई केली. तसेच १० मीटर एअर रायफल सांघिक स्पर्धेतही चौथा क्रमांक पटकाविला. या संघात आदित्य साळुंखे, सुमेध सासने व प्रतीक जोंग यांचा समावेश आहे.

## • शिवाजी विद्यापीठ संघाला चौथा क्रमांक

सर्वांना प्रशिक्षक डॉ. नीलेश पाटील, डॉ. धनंजय पाटील (आजरा महाविद्यालय), शिवाजी विद्यापीठचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. पी. टी. गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

23 FEB 2024
क्रांतिवीर
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या भुयारी मार्गाचे काम मुदतीत व्हावे

कोल्हापूर(प्रतिनिधी):- शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम भागास कायमस्वरुपी जोडण्याकरिता बांधण्यात येत असलेल्या भुयारी मार्गामुळे विद्यापीठातील विद्यार्थ्यांची तसेच अन्य घटकांची मोठी सोय होणार असल्याने सदरचे काम उत्तम पद्धतीने आणि मुदतीमध्ये पूर्ण करावे, असे निर्देश आज राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी आज सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना तसेच ठेकेदारांना दिले. सदर मार्गाच्या कामाचे भूमी पूजन मंत्री पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.



उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि विशेष प्रयत्नांमुळे शिवाजी विद्यापीठाच्या या भुयारी मार्गाच्या कामासाठी महाराष्ट्र शासनाकडून ८ कोटी ४८ लाख ८१ हजार ९४५ रुपयांचा निधी मंजूर झाला. त्यापैकी पहिल्या टप्प्यात २ कोटी ५० लाख रुपयांचा निधी विद्यापीठास प्राप्तही झाला आहे. त्यामधून या कामास आज प्रारंभ करण्यात आला.

मंत्री पाटील म्हणाले की, शिवाजी विद्यापीठाचा विस्तार काळानुसार पूर्व व पश्चिम अशा दोन्ही बाजूंना होतो आहे. भविष्यातही पूर्व बाजूला अनेक इमारती व संकुले निर्माण करण्यात येणार आहेत. त्यामुळे या दोन्ही बाजूंकडील विद्यार्थी, शिक्षक व अभ्यागत आदींची वर्दळ महामार्गावरुन वाढली होती. त्यातून अनेक छोटे-मोठे अपघात घडले. त्यामुळे या दोन्ही बाजू भुयारी मार्गाने जोडण्याची विद्यापीठाची मागणी होती. माझ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंत्री पदाच्या कार्यकाळात त्यास मान्यता देण्यात आली. आता उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून निधीची तरतूद केल्याने हे काम गतीने पूर्ण होईल. काम दर्जेदार करावे तसेच कार्यपूर्तीनंतर विद्यापीठानेही त्याची देखभाल व्यवस्थितरित्या करावी.

यावेळी मंत्री पाटील यांच्या हस्ते कार्यस्थळी कुदळ मारुन तसेच कोनशिलेचे अनावरण करून कामाचे भूमीपूजन समारंभ पार पडला. कार्यक्रमास परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता एस.टी. कुमार, कार्यकारी अभियंता एस.आर. पाटील, उपअभियंता हेमा जोशी, कनिष्ठ अभियंता पूजा देसाई, विद्यापीठाचे उपकुलसचिव (स्थावर) रणजीत यादव, कामाचे ठेकेदार राजू इनामदार यांच्यासह विद्यापीठाची व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद आणि अधिसभा यांचे सन्माननीय सदस्य, बांधकाम सल्लागार समितीचे सदस्य, अभियांत्रिकी विभागाचे कर्मचारी, विविध अधिविभागांचे प्रमुख, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.